New Doc 2017-12-30 (1)_1.jpg

ए. एल. जऱ्हाड
भा.प्र.से.
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
बृहन्मुंबई महानगरपालिका

अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय,
महापालिका मुख्य कार्यालय, ३ रा मजला,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी कार्यालय : २२६२ ०४३३,
२२६२ ०२५१ विस्ता. २
फॅक्स : २२६२ ०६३९
ई-मेल : ps.amccity@yahoo.in
अ. शा. पत्र क्र. : अति. आ./शहर/....डी..../...
तारीख : 23/10/2017

सन्मा. प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

विषय: बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत शाळांवर दंडात्मक कारवाई करणेविषयी मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ: 1. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009
2. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011

24/10/17
शालेय ... व क्रीडा विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

सन 2017-18 या वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध शैक्षणिक संस्थांमार्फत शासनाची/ बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता सुमारे 193 खासगी प्राथमिक शाळा अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले. यास्तव, या शाळा बंद करण्यासाठी संबंधित शाळा व्यवस्थापकांना या कार्यालयाव्दारे सुचनापत्रे (Notice) देण्यात आल्या आहेत. तसेच स्थानिक वर्तमानपत्रांतून या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना अन्य जवळच्या मान्यताप्राप्त खासगी किंवा महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आपल्या पाल्याचे प्रवेश घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मधील कलम 18(1) अन्वये शासन / स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय कोणतीही नवीन शाळा सुरु करता येत नाही. तसेच अशा प्रकारे मान्यतेशिवाय शाळा सुरु ठेवल्यास सदर अधिनियमातील कलम 18(5) अन्वये रुपये एक लाखापर्यंत आणि तेथून पुढे दररोज रुपये दहा हजार इतक्या रकमेचा द्रव्यदंड आकारण्याची तरतूद आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 (2009चा 35) च्या कलम अनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन या अधिनियमाच्या कलम 13 चे पोट-

s://mail.google.com/mail/u/0/#sent/160b5a58c03b42d7?projector=1&messagePartId=0.1
4:08 pm

कलम (2), कलम 18 चे पोट-कलम (5) आणि कलम 19 चे पोट-कलम (5) च्या प्रयोजनार्थ द्रव्यदंड आकारण्यास पुर्वपरवानगी देण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त यांना प्राधिकृत केले आहे. तसेच ही दंडात्मक कारवाई करताना कलम 33 मध्ये न्यायीक प्रक्रिया करण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. मात्र, त्याबाबतची कार्यपध्दती शासन नियमावलीत विहित करण्यात आलेली नाही.

सबब, मुंबई परिक्षेत्रातील 193 खाजगी प्राथमिक अनधिकृत शाळांवर द्रव्यदंडात्मक कारवाई करताना करावयाच्या न्यायीक प्रक्रियेबाबत कृपया, आपले मार्गदर्शन मिळावे, ही विनंती.

(ए.एल.ज-हाड)

महाराष्ट्र शासन

रजिस्टर अेडीने

क्र.माअअ-८०२१/प्र.क्र. २२१ /एसएम-३,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक ०७ जुलै,२०२१.

प्रति,
श्री प्रसाद बा.तुळसकर,
२०,परशुराम बिल्डिंग,राम मारुती रोड,
दादर,मुंबई-२८.

विषय:- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत दिनांक ११/०७/२०१९ रोजीचा अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचा आपला माहिती अधिकार अधिनियमाखाली केलेला दिनांक ११/०७/२०१९ चा अर्ज व त्यावरील मा.माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडे दिनांक ०६/०७/२०२१ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त , बृहन्मुंबई यांच्या दिनांक १७/१०/२०१७ च्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

३. उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास आपण विहित कालावधीत प्रथम अपील, प्रथम अपीलीय प्राधिकारी,श्री.इ.मु.काझी,सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर करावे.

Received on
14/07/2021
P.B.

आपला,
06.07.2021
(रा.वि.कुडले)
जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

क्र. एमआयएस-४७१९/प्र.क्र.१२४१ /एसएम-२,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादामा कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक :-२० सप्टेंबर,२०१९.

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक),सर्व जिल्हा परिषदा

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत शासन मान्यतेपूर्वीच शाळा सुरु केली असल्यास सदर शाळेस रुपये एक लक्ष इतका दंड आकारण्याबाबत.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,२०१२ अंतर्गत राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या शाळांना नव्याने / दर्जावाढीने शासन मान्यता देण्यात येते. तथापि असे निदर्शनास येत आहे की,काही शैक्षणिक संस्था शासन मंजुरीपूर्वीच शाळा सुरु करीत आहेत. अशा शासन मंजुरीपूर्वीच सुरु केलेल्या शाळांना सद्य:स्थितीत रुपये एक लक्ष इतका दंड आकारण्याबाबत शासन स्तरावर निर्णय झालेला आहे. सद्य:स्थितीत अशा प्रकारचा दंड भरण्याबाबत स्वतंत्र लेखाशीर्ष नाही. त्यामुळे शिक्षणाधिका-यांकडे ऑफलाईन पध्दतीने दंड भरावयचा असल्यास (०१) (०४) इतर बाबी (०२०२०३५८) या लेखाशीर्षाखाली कोषागारात जमा करुन त्याचे चलन घेण्यात यावे. तसेच ऑनलाईन पध्दतीने दंड भरावयाचा असल्यास gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावर चलनाद्वारे दंड जमा करुन त्याचे चलन घेण्यात यावे.

आपली,

स्वा. म. नानल
(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे,
शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.

Received on
14/07/2021
P.B.

4:12 pm